APPENDIX-B

MODEL UNIT-TEST PAPER IN MARATHI ALONGWITH THREE TABLES? QUESTION ANALYSIS AND MARKING SCHEME PREPARED BY THE INVESTIGATOR

## नमुना घटक चांचणी

सोबत नमुन्यादाखल संविधान तक्त्यावर आधारित एक घटक चांचणी दिलेली आहे. प्रस्तुत घटक चांचणीसाठी ' निसर्गपर कविता ' हा एक घटक मानला आहे. या घटकाखाली ' पाऊस,' ' बाभळी,' आणि ' एका सोनसकाळी ' अशा तीन कविता उपघटक आहेत. या घटक चांचणीचा संविधान तक्ता ज्या मूळ तीन तक्त्यावरून तयार केलेला आहे हे तीनही तक्ते सोबत दिलेले आहेत.

यातील पहिल्या तक्त्यावरून असे आढळून येईल की, हे तीन उपघटक शिकविताना ज्ञान, आकलन व रसग्रहण ही तीन उद्दिष्टे डोळ्यांसमोर ठेवलेली होती. या उद्दिष्टांना दिलेले गुण त्यांच्या मला वाटलेल्या महत्वांशावरून दिलेले आहेत. याबाबतीत प्रत्येक शिक्षकाला व्यक्तिगत स्वातंत्र्य असू शकेल.

उपघटकानुसार गुण विभागणी या दुसऱ्या तक्त्यावरून असे आढळून येईल की, पाऊस, बाभळी व एका सोनसकाळी या उपघटकांना अनुक्रमे ८, ८, ९ असे गुण दिलेले आहेत. त्यावरून या तीनही घटकांना जवळजवळ सारखेच महत्त्व दिलेले आहे हे लक्षात येईल. त्यातील ' एका सोनसकाळी ' या घटकाला इतर दोन प्रत्येक घटकांपेक्षा १ गुण जास्त आहे. ते केवळ चांचणीची २५ गुण संख्या व्हावी म्हणूनच. तसेच इतर दोन कवितांपेक्षा या कवितेची काठिण्य-पातळी थोडीशी वरची आहे व ही कविता शिकविताना थोडासा अधिक वेळ

द्यावा लागला. हे अर्थातच थोडेसे व्यक्तिनिष्ठ आहे. इतर शिक्षक माझ्या या मताशी सहमत होतीलच असे नाही. शिक्षकाला असे थोडे फार स्वातंत्र्य घेण्यास हरकत नाही. अट एवढीच की, घटक चांचणीत उपघटकांना दिलेले गुण हे वर्गात ते ते घटक शिकविण्यासाठी लागणारा वेळ आणि त्या त्या उपघटकांची त्या शिक्षकाला वाटलेली काठिण्यपातळी यांचे प्रमाणात असावेत.

प्रश्नप्रकारानुसार गुणविभागणी हा तिसरा तक्ता चांचणीमध्ये विचारावयाचे विविध प्रश्नप्रकार, त्यांची संख्या आणि त्यांना दिलेले गुण दर्शवितो. चांचणीत कोणत्या प्रकारचे आणि किती प्रश्न विचारायचे या दोन गोष्टी आपल्याला कोणत्या उद्दिष्टांचे मापन करावयाचे आणि त्यांना किती महत्वांश द्यावयाचे याच्या अनुषंगाने येतात.

या तीनही तक्त्यानंतर त्यावर आधारित संविधान तक्ता दिलेला आहे.

प्रश्नपत्रिकेनंतर चांचणीतील प्रत्येक प्रश्नाचे विश्लेषण उद्दिष्टे स्पष्टीकरण, उपघटक, प्रश्नप्रकार, गुण, अंदाजे वेळ, काठिण्यपातळी या सात शीर्षकांखाली केले आहे. हेतू हा की, चांचणीतील प्रश्न संविधान तक्त्याशी पडताळून पाहता यावेत आणि चांचणी संविधान तक्त्यानुसार आहे की नाही हे तपासून पाहता यावे. यालाच प्रश्न-विश्लेषण असे म्हणतात. त्यानंतर गुणदान योजना दिलेली आहे. ही गुणदान योजना शिक्षकांची प्रश्न विचारण्यामागील भूमिका स्पष्ट व्हावी आणि उत्तरपुस्तिकांच्या तपासणीत व्यक्तिनिष्ठता येऊ नये या हेतूने दिलेली आहे.

त्यानंतर घटक वाचणीच्या संदर्भात येणाऱ्या महत्वाच्या संज्ञांचे स्पष्टीकरण आपल्या तयार संदर्भासाठी (ready reference) दिलेले आहे.

आपण या सर्वांचा काळजीपूर्वक अभ्यास करून मगच प्रश्नावलीतील प्रश्नांची उत्तरे द्यावीत ही विनंती.

## तक्ता क्र. १

### उद्दिष्टांनुसार गुणविभागणी

| अनु. | उद्दिष्ट | गुण | शेकडा गुण |
|---|---|---|---|
| १) | ज्ञान | ०३ | १२ |
| २) | आकलन | ११ | ४४ |
| ३) | रसग्रहण | ११ | ४४ |
| | एकूण : | २५ | १०० |

## तक्ता क्र. २

### उपघटकांनुसार गुणविभागणी

| अनु. | उपघटक | गुण | शेकडा गुण |
|---|---|---|---|
| १) | पाऊस | ०८ | ३२ |
| २) | बाभळी | ०८ | ३२ |
| ३) | एका सोनसकाळी | ०९ | ३६ |
| | एकूण : | २५ | १०० |

## तक्ता क्र. ३

## प्रश्नप्रकारानुसार गुणविभागणी

| अनु. | प्रश्न प्रकार | प्रश्न संख्या | गुण | शेकडा गुण |
|---|---|---|---|---|
| १) | वस्तुनिष्ठ प्रश्न | ६ | ६ | २४ |
| २) | लघुत्तरी प्रश्न | ९ | १९ | ७६ |
| ३) | दीर्घोत्तरी प्रश्न | - | - | - |
| | एकूण : | १५ | २५ | १०० |

## घटक चाचणी

इयत्ता : ८ वी  विषय : मराठी  गुण : २५  वेळ : ३५ मिनिटे

घटक : निसर्गवर्णनपर कविता

उपघटक : १) पाऊस, २) बाभळी, ३) एका सोनसकाळी

सूचना : खालील प्रश्न क्र. १ ते ३ मध्ये रिकाम्या जागी योग्य शब्द घालून कवितेच्या ओळी पूर्ण भरा :

१) ......... जलदांची झाली दाटी. १

२) कुसर कलाकृति अशी बाभळी तिला न ठावी....... १

३) ........ स्वर फुलले पाखरांच्या गळ्यात. १

सूचना : खालील प्रश्न क्र. ४ व ५ मध्ये रिकाम्या जागी कंसात दिलेल्या शब्दांमधून योग्य शब्द निवडा व वाक्य पूर्ण लिहा.

४) ' मारुत ' म्हणजे ....... होय. १
(वारा, वावटळ, हवा)

५) ' तालेवार ' या शब्दाचा अर्थ....... आहे. १
(प्रतिष्ठित, भाग्यवंत, श्रीमंत)

सूचना : खाली एक विधान दिले आहे. त्या विधानाच्या कारणाचे दोन पर्यायातून एक पर्याय निवडून तुमच्या उत्तरपत्रिकेत तो लिहा.

६) कवयित्रीचे मन बाभळीपाशी रमते कारण..... १

अ) ते तेथे जाऊन नवे होऊन परतते.

ब) ते हिरवे नाजूक लेणे धारण करते.

[library stamp]

सूचना : प्रश्न क्र. ७ ते ११ ची उत्तरे प्रत्येकी दोन-तीन ओळीत लिहा.

७) कवीला मेघांची रांग खाली येताना कशी दिसली ? १

८) कवीने मधुमोत्यांची उपमा कोणास दिली आहे ? का ? १

९) कवीने बाभळीच्या एकटेपणाचे वर्णन कसे केले आहे ? १

१०) कवीने सकाळला ' सोनसकाळ ' का म्हटले आहे ? १

११) सकाळचे आनंदी वातावरण सूचित करणारी कवितेतील एक कल्पना स्पष्ट करा. २

१२) खालील ओळीतील सौंदर्य स्पष्ट करा : १

येते परतुन नवेच होऊन
लेवुन हिरवे नाजूक लेणे.

१३) खालील कल्पनेतील सौंदर्य विशद करा : १

बासुराची होऊनिया मन
रमते तेथे सांजसकाळी.

१४) ' एका सोनसकाळी ' या कवितेतील कोणतीही दोन सौंदर्यस्थळे विशद करा. ३

१५) ' पाऊस ' या कवितेतील तुम्हाला आवडलेली एखादी कल्पना सांगून ती का आवडली हे स्पष्ट करा. १

## प्रश्न विश्लेषण

| प्रश्न क्र. | उद्दिष्ट | स्पष्टीकरणे | उपघटक | प्रश्न प्रकार | गुण | अंदाजे वेळ मिनिटे | पातळी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ज्ञान | उत्तर आठवून लिहितो | पाठ्यांश | वस्तुनिष्ठ | १ | १ | सोपी |
| २. | ,, | -,,- | बाभळी | ,, | १ | १ | सोपी |
| ३. | ,, | -,,- | एका सोनसकाळी | ,, | १ | १ | सोपी |
| ४. | आकलन | योग्य शब्द आकलनाने ओळखतो | पाठ्यांश | ,, | १ | १ | मध्यम |
| ५. | ,, | -,,- | एका सोनसकाळी | ,, | १ | १ | मध्यम |
| ६. | ,, | योग्य पर्याय आकलनामुळे ओळखतो | बाभळी | ,, | १ | १ | मध्यम |
| ७. | ,, | योग्य उत्तर आकलनाने ओळखतो | पाठ्यांश | लघूत्तरी | २ | ३ | मध्यम |
| ८. | रसग्रहण | रसग्रहण करतो. | पाठ्यांश | ,, | २ | ३ | सोपी |
| ९. | आकलन | आकलनाने वर्णन करतो. | बाभळी | ,, | २ | ३ | सोपी |
| १०. | ,, | आकलनाने उत्तर शोधतो | एका सोनसकाळी | ,, | २ | ३ | मध्यम |
| ११. | ,, | आकलनाने कल्पनेचे स्पष्टीकरण देतो | ,, | ,, | २ | ३ | मध्यम |
| १२. | रसग्रहण | रसग्रहणवृत्तीने सौंदर्याचे स्पष्टीकरण देतो. | बाभळी | ,, | २ | ३ | मध्यम |
| १३. | ,, | कल्पनेतील सौंदर्याचे रसग्रहण करतो | बाभळी | ,, | २ | ३ | कठीण |
| १४. | ,, | रसग्रहणवृत्तीने सौंदर्यस्थळे सांगतो. | एका सोनसकाळी | ,, | २ | ५ | कठीण |
| १५. | ,, | कल्पनेचे रसग्रहण करतो. | पाठ्यांश | ,, | २ | ३ | कठीण |
| | | | | | २५ | ३५ | |

## गुणदान योजना

| प्रश्न क्र. | उत्तरे | गुण |
|---|---|---|
| १. | व्योमपटी | १ |
| २. | नागररीती | १ |
| ३. | आकाशाचे | १ |
| ४. | वारा | १ |
| ५. | भाग्यवंत | १ |
| ६. | ते तेथे जाऊन नवे होऊन परतते. | १ |
| ७. | कवीला मेघांची रांग पाण्याने थबथबलेली दिसली. तसेच ओथंबत खाली येताना दिसली. | १ + १ |
| ८. | कवीने पावसाच्या थेंबांना मधुमोत्यांची उपमा दिली आहे. | १ |
| ९. | कारण पावसाचे थेंब सुंदर अशा मोत्याप्रमाणे चकचकीत, वाटोळे व तेजस्वी दिसत होते. | १ |
| | बाभळी दूर कुठेतरी बांधावरती आहे. | १ |
| १०. | ती थोडीशी झुकलेली असून एकटीच उभी आहे. कोवळ्या सोनेरी उन्हामुळे कवीला सकाळ ` सोनसकाळ ` वाटते. | १ + १ |
| | त्या सकाळी कोवळे ऊन्ह पडले होते. | १ |
| ११. | कोणतीही एक कल्पना सांगितल्यास - | १ |
| | ती कल्पना स्पष्ट केल्यास - | १ |

उदा. सकाळच्या आनंदी वातावरणात शेतांना स्वर
फुटला आहे असे वाटते (कल्पना)
सकाळी पक्षी गोड किलबिल करीत आहेत
त्यामुळे जणू शेतच आनंदाने गाते आहे असे
वाटते (स्पष्टीकरण)

| प्रश्न क्र. | उत्तरे | गुण |
|---|---|---|
| ११. | कवयित्रीचे मन बाभळीपाशी जाते व जीवनाच्या धकाधकीने त्रस्त झालेले, कंटाळलेले, निराश झालेले हे मन बाभळीचे सौंदर्य पाहून सुखावते. | १ |
| | बाभळीपासून ते स्फूर्ति, उत्साह घेऊन ताजेतवाने बनते. येथे ताज्या मनासाठी हिरव्या नाजूक लेण्याची उपमा दिली आहे. | १ |
| १२. | ज्याप्रमाणे गुराख्याची लहान मुले बाभळीखाली गुरे सोडून खेळण्यात रमून जातात त्या गुराख्यांच्या मुलांप्रमाणे कवयित्रीचे मन बाभळीखाली सकाळ-संध्याकाळ रमते. | २ |
| १४. | कोणतीही दोन सौंदर्यस्थळे : | |
| | सौंदर्यस्थळ १ | $1\frac{1}{2}$ |
| | सौंदर्यस्थळ २ | $1\frac{1}{2}$ |
| | उदा. आजुबाजूला सर्वत्र पडलेले सोनेरी ऊन्ह पाहून कवयित्री म्हणते की, जणू काही आकाश शेतामधून सोनं पेरून गेले आहे. | |
| १५. | कवितेतील कल्पना सांगणे | १ |
| | ती कल्पना स्पष्ट करणे. | १ |
| | | २५ |